महाराष्ट्र वन विभाग

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे
सेनापती बापट मार्ग, सिम्बायोसिस कॉलेज समोर, पुणे- ४११ ००४.
दुरध्वनी क्र. ०२०-२५६६०५९३ ईमेल - dycfpune@gmail.com dycfpune@mahaforest.gov.in

क्रमांक - कक्ष-३.१/आस्था/भरती-२०२३/५०४५/ सन २०२३-२४ दिनांक - २९/०२/२०२४

**आदेश**

विषय - वनरक्षक (गट-क) पदावर नियुक्ती आदेश.

संदर्भ - मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) पुणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-३.१/आस्था/बी-४००/सन २०२३-२४ दि. २९/०२/२०२४

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सरळसेवेने निवड केलेल्या वनरक्षक (गट-क) या संवर्गातील पुणे वनविभागातील रिक्त पदांचे अनुषंगाने पदस्थापना व नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची यादी या कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणे पुणे वनवृत्ताच्या आस्थापना अंतर्गत ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-७ मधील रु. २१७००-६९१०० या वेतनश्रेणीत नियमानुसार मिळणाऱ्या इतर भत्त्यासह निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात वनरक्षक (गट-क) या पदावर नियुक्ती खालील अटी व शर्तीचे अधिन राहून देण्यात येत आहे.

| उमेदवार यांचे नांव व पत्ता | अर्जात नमूद प्रवर्ग | नियुक्ती प्रवर्ग | स्त्री / पुरूष | समांतर आरक्षण | नियुक्तीचे ठिकाणी |
|---|---|---|---|---|---|
| श्रीमती प्रगती सुनिल रणपिसे, रा. मु.पो. गडकवाडी, पो.वरुडे, ता. खेड, पुणे पिनकोड ४१०५०५. | आ.दु.घ. | अराखीव | स्त्री | महिला | वनसंरक्षक (कार्य आयोजना) पश्चिम पुणे |

१. सदर नियुक्तीचे आदेश हे तात्पुरत्या स्वरुपाचे असुन कोणतेही कारण अथवा पूर्व सूचना न देता आपणास वनरक्षक या पदावरुन कमी करण्यात येईल तसेच सदर आदेशाच्या निर्गमित दिनांकापासून आपण ३० दिवसांत अगर तत्पूर्वी नेमणुकीच्या ठिकाणी रुजू व्हावे. मुदतीत नेमणूकीच्या पदावर रुजू न झाल्यास आपली निवड व आदेश रद्द समजण्यात येईल.

२. शासकीय कर्मचाऱ्यांकरीता, महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सर्व) व त्यामध्ये वेळोवेळी झालेले व होणारे बदल, तसेच शासनाने निर्गमित केलेले आदेश आपणास लागू व बंधनकारक राहतील. हजर झालेनंतर काही प्रशासकीय कारणास्तव शासनास आपल्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही वेळी कोणतीही पूर्व सूचना न देता शासन सेवेतून कमी करण्यात येईल.

३. नियुक्तीच्या पदावर रुजू झाल्यावर आपणास राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना अगोदर कार्यालयास लेखी सूचना देणे आवश्यक आहे, तसे न केल्यास आपणास एक महिन्याचे वेतन शासनास द्यावे लागेल.

४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये निर्देशित केल्यानुसार, त्यांना परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना व त्याच्या तरतुदी लागू राहतील. त्याप्रमाणे आपण रुजू होतांना तसे प्रतिज्ञापत्र हजर होणाऱ्या कार्यालयास सादर करावे.

५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१७/२०००/१२, दि. ०१/०७/२००५ अन्वये लहान कुटुंबाची अट घातली आहे,तसे प्रतिज्ञापत्र आपण रुजू होतांना सबंधित कार्यालयास लेखी स्वरुपात द्यावे.

६. आरक्षित जागेवर निवड झालेल्या उमेदवारांनी शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब, दि. १२/१२/२०११ अन्वये नियुक्तीच्या ठिकाणी हजर होताना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येत आहे. नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आंत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास अथवा नियुक्तीचे आदेशाचे तारखेपासून सहा महिन्यात जात वैधता (Caste Validity) प्रमाणपत्र सादर न केल्यास आपले नियुक्ती आदेश त्वरित रद्द केले जातील.

Deputy Conservator of Fo... Pune